# प्रेस नोट

मा.श्रीमती स्वाती साठे कारागृह उपमानिरीक्षक,पश्चिम विभाग, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली आज दि.१९/१/२०२४ रोजी येरवडा महिला कारागृह,पुणे येथे रोटरी क्लब पुणे ,पश्चिम यांचे मार्फत कारागृहातील महिला बंद्याना १००० रियुजेबल Hygienic to use,Environment Friendly सॅनिटरी क्लोथ वाटप करण्याचा कार्यक्रम संपन्न झाला.

याप्रसंगी रोटरी क्लब,पुणे पश्चिम यांचे अध्यक्ष श्री.विपीन घाटे तसेच संस्थेचे सदस्य वैशाली गदरे,माधुरी घाटे,वैजंयती पाथारकर,अनिल सपरे,निरंजन मथुरे इ. सदस्य उपस्थित होते. संस्थेचे वैजंयती पाथारकर यांनी सॅनिटरी क्लोथचा वापर कसा करायचे याबाबत मार्गदर्शन केले व महिलांना सॅनिटरी क्लोथ वाटप करण्यात आले.

सदर कार्यक्रमास कारागृह अधीक्षक श्री. सुनिल ढमाळ उपस्थीत होते.कारागृह उप-अधीक्षक श्रीमती पल्लवी कदम यांनी कार्यक्रमांच्या शेवटी संस्थेच्या सर्व सदस्याचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन शिक्षिका श्रीमती ऋणाक्षी गवळी यांनी केले. कार्यक्रमास महिला तुंरुगाधिकारी आर.ए.खिलारी व पोर्णिमा पालोदकर ,प्रयास संस्थेचे सामाजिक कार्यकर्ते हिना सय्यद व महिला कर्मचारी उपस्थित होते.